पाक्षिक

वार्षिक वर्गणी रु. ३०

किंमत १ रुपया २५ पैसे

# शेतकरी संघटक

वर्ष ११ वे

अंक १८ वा

२१ फेब्रुवारी १९९५

## देशाला लुटण्याचा गुत्ता घेऊ पाहाणाऱ्यांच्या तावडीतून

# देशाला वाचविण्यासाठी

**— शरद जोशी**

**फेब्रुवारी १९९५ मधील महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणुकीमध्ये शेतकरी संघटनेने स्वतंत्र भारत पक्षाच्या उमेदवारांसाठी आपली सर्व शक्ती पणाला लावण्याची भूमिका घेतली. या भूमिकेचे विश्लेषण शरद जोशींनी संपूर्ण महाराष्ट्रभर दौरा करून सभांमध्ये केले. त्यापैकी उमरखेड जि. यवतमाळ येथील भाषणाचे हे शब्दसंकलन.**

महाराष्ट्राचा दौरा करायला लागलो की एक नेहमी जाणवते, आता निवडणुकीच्या हंगामात तर ते विशेषत्वाने जाणवते. या वेळी पुण्याहून दौरा सुरू केला. पुणे म्हणजे पवारांचं राज्य. पुण्याहून कोल्हापूरला आलो, तिथं वसंतदादा पाटील आणि त्यांच्या कंपनीचं राज्य. तिथून सोलापूरला आलो तिथं शिंद्यांचं राज्य. तिथून लातूरमध्ये आले तर तिथं कोणा एका शिवराज पाटलाचं किंवा विलासरावांचं राज्य. पुढे नांदेडला आलो तर तिथं शंकररावांचं राज्य. विदर्भात यवतमाळमध्ये शिरावं तर नाईकांचं राज्य. नाशकात जावं तर हिऱ्यांचं, जळगावात जैनांचं तर धुळ्यात आणखी कोणाचं राज्य. महाराष्ट्रात कोणत्याही जिल्ह्यात किंवा विभागात पाहावं तर कोणाचं ना कोणाचं तरी राज्य असल्याची जाणीव होते.

एके काळी संपूर्ण देशामध्ये संस्थानंच संस्थानं झाली होती, ती संस्थानं विलीन करून सरदार वल्लभभाई पटेलांनी एक देश तयार केला. जुनी संस्थानं गेली आणि गेल्या सत्तेचाळीस वर्षांत नवी संस्थानं तयार झाली. अजून तरी या नवीन संस्थानांमध्ये नव्या संस्थानिकांना जुन्या संस्थानिकांइतकं प्रेम लाभलेलं दिसत नाही. आणि प्रत्येक संस्थानांचं वैशिष्ट्य असं की तिथले लोक स्वतंत्र आहेत असंही नाही. जिथं जिथं संस्थानासारखं वातावरण आहे तिथं शेतकरी संघटनेसारख्या संघटनेच्या सभेला लोक समोर येऊन बसायलासुद्धा घाबरतात. ऐकायचं तर असतं, मग कुठंतरी दूर कोपऱ्यात बसून ऐकतात. शरद जोशींच्या सभेला आपण पुढे जाऊन बसलो असं जर का कुणा भाऊसाहेबांना, काकासाहेबांना, मामासाहेबांना कळलं तर ते आपल्याला बोलावून काय प्रश्न विचारतील याच्या धास्तीने लोक सभेला समोर येत नाहीत, असं या प्रत्येक संस्थानातलं वातावरण आहे.

देश स्वतंत्र होऊन सत्तेचाळीस वर्षे झाली तरी हे वातावरण आहे; तेव्हा प्रश्न असा पडतो की स्वातंत्र्यानंतर आपण मिळवलं काय? पंधरा वर्षांपूर्वी शेतकरी संघटनेच्या मंचावरून मी पहिल्यांदा हा प्रश्न विचारला. त्यावेळी हा जो

## आज देश खरंच स्वतंत्र आहे का?

### स्वातंत्र्यानंतर आजपर्यंत जे काही झालं आहे ती प्रगती आहे का?

★ एकदा, बिहारमध्ये असतांना गांधीजी एका झोपडीमध्ये पाणी मागायला गेले. त्यावेळी बाईचा फक्त हात पाण्याचं फुलपात्र घेऊन झोपडीच्या कवाडातून बाहेर आला. गांधीजींनी चौकशी केल्यावर समजलं की या झोपडीमध्ये एक आई आणि तिची मुलगी राहाते. दोघींना मिळून एकच साडी आहे. आई ती साडी नेसून बाहेर गेली होती म्हणून ती बाई बाहेर आली नाही, तिनं फक्त हातानं पाणी दिलं. तिथं महात्मा गांधींनी असं ठरवलं की माझ्या देशातील मायबहिणींना जोपर्यंत पुरं वस्त्र मिळत नाही तोपर्यंत मलासुद्धा अंगभर कपडे घालण्याचा अधिकार नाही, मी फक्त पंचा नेसून चालेन. आता प्रश्न असा आहे की आज महात्माजी जिवंत असते तर ते असे म्हणू शकले असते का की आता मला नुसत्या पंचावर राहायची जरूरी नाही, आता मी पूर्ण कपडे घालून फिरू शकतो?

★ साबरमती सोडून महात्मा गांधी निघाले आणि त्यांनी म्हटलं की स्वातंत्र्य मिळाल्याखेरीज मी साबरमतीला परत जाणार नाही, शेवटपर्यंत ते परत गेले नाहीत. आता दुसरा प्रश्न उभा राहातो की आज गांधीजी जिवंत असते तर ते साबरमतीला गेले असते का?

*(शरद जोशींच्या निवडणूक भाषणांतून)*

प्रश्न विचारला त्याकडे अजून काही या देशाच्या नेत्याचं लक्ष गेलेलं आहे असं मला दिसत नाही.

नेमका प्रश्न काय आहे? स्वातंत्र्य चळवळीच्या वेळी महात्मा गांधींनी आपल्याला सांगितलं होतं की गोरा इंग्रज इथून गेला म्हणजे आपले शोषण थांबेल, देशाची लूट थांबेल आणि देशातला अगदी दरीद्रीनारायणसुद्धा सुखी होईल. त्याच्याकरिता कित्येक तरुणांनी हसत हसत बलिदान केलं. स्वातंत्र्य मिळालं. पहिली पाच-दहा वर्षे गडबडीत, धावपळीत गेली. पाकिस्तानचा प्रश्न, काश्मिरचा प्रश्न असे काही प्रश्न समोर आहेत म्हणता म्हणता तीस पस्तीस वर्षे गेली, आज सत्तेचाळीस वर्षे गेली.

१९८० साली मी प्रश्न विचारला, स्वातंत्र्य मिळून तीसपस्तीस वर्षे झाली तरी शेतकऱ्याच्या घरातली गरीबी संपली का नाही? उलट, स्वातंत्र्याच्या वेळी शेतकऱ्याच्या घरी जितकी बरी परिस्थिती होती तितकीसुद्धा चांगली राहिलेली नाही.

'सत्तेचाळीस साली तुमच्या घरातील लहान मुलाच्या ताटामध्ये ताक, दूध, तूप काय वाढलं जात होतं आणि आज तुम्ही तुमच्या पोराला, नातवाला काय देता त्याची तुम्ही तुलना करा' म्हणजे प्रश्नाचं गांभीर्य लक्षात येईल. आकडेवारी आणि पांडित्याची काही आवश्यकता नाही.

शेतकऱ्याच्या डोक्यावरचं कर्ज तसंच वाढत गेलं. आम्हाला सांगण्यात आलं की सावकार गेला, जमीनदार गेला म्हणजे सगळं काही नीट होईल; सावकार गेला त्याच्याऐवजी सहकारी सोसायटी आली, बँका आल्या, भू-विकास बँका आल्या तरी आमच्या डोक्यावरचं कर्ज काही संपायचं लक्षण नाही. हे असं का होतं?

हा प्रश्न मी १९८० साली मांडला आणि त्याचं उत्तर त्याचवेळी शेतकऱ्यांसमोर दिलं. उत्तर असं की, शेतकरी गरीब आहे कारण शेती तोट्यात आहे; शेतीमालाला भाव मिळत नाही म्हणून शेती तोट्यात आहे; आणि शेतीमालाला भाव मिळत नाही, कारण सरकारचं असं धोरण आहे की शेतकऱ्याच्या मालाला भाव मिळता कामा नये; शेतकऱ्याच्या मालाला भाव मिळत नाही याला कारण व्यापारी नाही, आडत्या नाही, सावकार नाही, नशीब नाही, ग्रह नाही, अस्मानी नाही, त्याचं कारण आहे सुलतानी. सरकार शेतकऱ्याला भाव मिळू देत नाही.

त्यावेळी मी असं म्हटलं आणि देशातले सर्व विद्वान, अर्थशास्त्री, पुढारी माझ्यावर तुटून पडले. 'हे काय शेतकऱ्याच्या घरचे नाहीत, शेतकऱ्याच्या जातीचे नाहीत, यांना काय समजतंय?' कुणी म्हणाले, अमेरिकेचे एजंट आहेत, कुणी म्हणाले आर्. एस्. एस्. चे एजंट आहेत. त्याहून त्यांचा राग असा की हिंदुस्थानचं दिल्लीचं सरकार, पंडित नेहरूंचं सरकार, इंदिरा गांधींचं सरकार आपल्याच देशाच्या शेतकऱ्याला भाव मिळू देणार नाही हे कसं शक्य आहे? हे इतके लोकप्रिय नेते! लोक इंदिरा गांधींना दुर्गामाता म्हणत. आणि जवाहरलाल नेहरू म्हणजे तर रयतेच्या गळ्यातला ताईत, रुबाबदार व्यक्तिमत्व. असा माणूस आपल्या देशातल्या शेतकऱ्यांचे गळे कापतो हे कसं शक्य आहे?

हे सर्व पंधरा वर्षांपूर्वी झालं. आता या विषयावर काही वाद घालण्याची गरज उरली नाही. पंधरा वर्षांपूर्वी आम्ही जे सांगितलं ते आज कागदोपत्री सिद्ध झालं आहे. डंकेल प्रस्तावावर सही करतांना भारत सरकारचे व्यापार मंत्री प्रणव मुखर्जी यांच्या सहीने सरकारने कबुलीजबाब दिला आहे.

कबुलीजबाब काय आहे? डंकेल प्रस्तावामध्ये, शेतकऱ्यांची सबसिडी कमी केली पाहिजे असा प्रस्ताव आहे. त्यासाठी 'गॅट' मध्ये सहभागी प्रत्येक देशाच्या सरकारने आपल्या देशातील शेतकऱ्यांना सबसिडी किती दिली जाते हे सांगितलं पाहिजे. जपानच्या सरकारने सांगितलं की आमच्या देशात शेतकऱ्याला ९० टक्के सबसिडी आहे. म्हणजे, खुल्या बाजारामध्ये शेतकऱ्याला १०० रुपये मिळाले असते तर आम्ही धोरण असं चालवतो की शेतकऱ्याला १९० रु. मिळावेत. यूरोपीय देशांनी लिहून दिलं की आम्ही शेतकऱ्यांना ६५ टक्के सबसिडी देतो तर अमेरिकने लिहून दिलं की आम्ही ३५ टक्के सबसिडी देतो. हिंदुस्थान सरकारवर जेव्हा असं लिहून देण्याची पाळी आली तेव्हा त्यांनी लेखी निवेदन दिलं की आमचं धोरण असं आहे की खुल्या बाजारात जर शेतकऱ्याला १०० रुपये मिळाले असते तर त्याला फक्त २८ रुपयेच मिळावेत. म्हणजे हिंदुस्थानात शेतकऱ्यांना ७२ टक्के उणे सबसिडी म्हणजे उलटी पट्टी आहे याचा लेखी कबुलीजबाब हिंदुस्थान सरकारकडून आपल्या हाती आला आहे.

मला आश्चर्य वाटतं की इतकी मोठी गोष्ट बाहेर आली तरी देशामध्ये काही हालचाल झाली नाही. खरं तर, हे कटकारस्थान उघड झाल्याबरोबर देशामध्ये मोठं तूफान उठायला हवं होतं. सगळ्या देशातल्या शेतकऱ्यांना समजायला कदाचित अडचण आली असेल. कारण उलटी पट्टी, उणे सबसिडी हे शब्द समजायला कठीण आहे.

प्रणव मुखर्जींनी लोकसभेमध्ये निवेदन केलं की आम्ही शेतकऱ्याला दरवर्षी चोवीस हजार कोटी रुपयांना लुटतो. आणि तरीदेखील त्यांच्या पक्षाची माणसं जणू काय आपणच देश चालवतो, जणू काय आपणच देशाचं भलं करू शकतो अशा थाटात अजून चालताहेत.

१९८० साली ही मंडळी काय म्हणायची? शेतीमालाच्या रास्त भावाची मागणी ही सामान्य शेतकऱ्याची नाही; गरीब शेतकऱ्याची नाही; ही मोठ्या शेतकऱ्याची, धनाढ्य बागायतदार शेतकऱ्यांची मागणी आहे. आम्ही समाजवादाच्या नावाखाली गरीबांचं भलं करतो म्हणून आम्ही शेतकऱ्यांना लुटतो! म्हणजे समाजवादाचा झेंडा, आणि लुटायचं ते देशातले सगळ्यात गरीब म्हणजे जे शेतकरी आणि शेतमजूर त्यांनाच!

स्वातंत्र्यानंतर चाळीस पंचेचाळीस वर्षे हे असंच चालत राहिलं. नंतर दोन महत्त्वाच्या घटना घडल्या. एक घडली १९९१ साली आणि दुसरी डंकेल प्रस्तावावर सही करताना.

१९९१ साली सगळ्या जगाला हादरविणारी गोष्ट घडली. गेली कित्येक वर्षे आपल्या देशातले नेते, कार्यकर्ते सांगायचे की समाजवाद देशाचं भलं करतो. नेहरूंनी म्हटलं की समाजवादी नियोजन व्यवस्थेने आपण देशातील गरीबांची गरीबी हटवू. सगळे त्यासाठी रशियचं उदाहरण समोर ठेवायचे. म्हणायचे, समाजवादी रशियात गरीब राहिले नाहीत, गुरीब राहिले नाहीत; रशिया म्हणजे कामगारांचा स्वर्ग, रशिया म्हणजे शेतकऱ्यांचा स्वर्ग! पण असं नाटकच चाललं होतं. १९९१ साली ते नाटक संपलं आणि रशियामधील प्रमुखांनीच जाहिर केलं की आमची चूक झाली; ऐंशी वर्षे आम्ही समाजवादाचा

प्रयोग केला. विकास झाला नाही अन् काही नाही. रशियासारखा थंड प्रदेश, प्रचंड बर्फ पडतं, पण अशा बर्फातसुद्धा हिवाळ्याच्या रात्री कुडकुडत पावाचा एखादा तुकडा मिळावा म्हणून लोकांना फूटपाथवर रांगा लावून उभं राहायला लागलं तेव्हा त्यांना कबूल करावं लागलं की हे नाटक होतं. समाजवाद हे औषध नाही, समाजवाद हे विष आहे हे ९१ साली जगभर जाहिर झालं. आणि रशियाने 'बळीराज्या'च्या दिशेने वाटचाल सुरू केली.

या निवडणुकीच्या निमित्ताने वेगवेगळ्या जिल्ह्यांतील या संस्थानिकांच्या संस्थानांमधून जाताना मला एक प्रश्न पडतो की १९९५ सालच्या निवडणुका आणि १९९० सालच्या निवडणुका यांतील भाषणांमध्ये काहीतरी फरक असायला हवा की नको? ९० सालच्या निवडणुका झाल्या. त्यानंतर ९१ साली जगामध्ये समाजवादाचा पराभव झाला. हिंदुस्थानामध्ये काँग्रेसचे पंतप्रधान राव यांनी स्वतः कबूल केलं की नेहरूवादानं देशाचं नुकसान झालं, आता आम्ही खुली व्यवस्था स्वीकारणार आहोत. आणि गेल्या वर्षी, १९९४ साली सरकार नावाचा खिसेकापू आपल्या हाती 'रंगेहाथ' सापडला. त्यांनी स्वतः कबूल केलं की आम्ही शेतकऱ्यांना लुटतो, दरवर्षी चोवीस हजार कोटी रुपयांना लुटतो. या दोन घटना घडल्यानंतर निवडणुकांच्या भाषणांत काही फरक पडावा की नाही?

१९९१ साली देशाची हालत इतकी वाईट झाली की देशातलं सोनंसुद्धा बाहेर नेऊन गहाण ठेवावं लागलं. मग आता १९८० साली मी जो प्रश्न शेतकऱ्यांना विचारला तो प्रश्न पुन्हा कोणी तरी सर्वच भारतीयांना विचारला पाहिजे की नाही? आता स्वातंत्र्य मिळवून सत्तेचाळीस वर्षे झाली आणि अजून स्वातंत्र्यानंतर देशाची प्रगती व्हायची लक्षणं दिसत नाहीत; उलट अधोगती होते आहे. १९४७ साली आपला देश जेव्हा स्वतंत्र झाला तेव्हा जगात चाळीस देश होते आणि त्यात आपल्या देशाचा क्रमांक वरून तेरावा होता. आज जगात एकशे ऐंशी देश आहेत आणि त्यांत आपला क्रमांक खालून पाचवा म्हणजे वरून एकशे शहात्तरावा आहे.

असं का झालं? स्वातंत्र्यानंतर देशामध्ये जे स्वप्न उभं राहील असं गांधीजींनी सांगितलं होतं ते खोटं का ठरलं? या प्रश्नाचं उत्तर द्यायला, या निवडणुकीच्या भाषणात, कुणी तयार नाही.

शेतकरी संघटनेने एक नवीन धोरण १९८० सालापासून चालवलं. आम्हाला राजकारण नको, सरकारात जायचं नाही, सत्तेत जायचं नाही आम्हाला फक्त आमच्या घामाचं दाम पाहिजे, शेतीमालाचा भाव पाहिजे; ते मिळविण्यात अडकाठी आणू नका म्हणजे झालं. आमची मागणी कशी होती?

एका आंधळ्या भिकाऱ्याची गोष्ट सांगतो. एकदा त्या भिकाऱ्याला देव प्रसन्न झाला आणि म्हणाला, 'एकच वर माग.' भिकारी म्हणाला की, 'माझा नातू सोन्याच्या चमच्याने दूध पितांना पाहू दे.' म्हणजे एका वरात त्यानं काय काय मागितलं? लग्न झालं पाहिजे, मुलगा झाला पाहिजे, त्याचं लग्न होऊन त्याला मुलगा झाला पाहिजे, त्याला दूध पितानां पाहायचं म्हणजे तोपयर्यंत आयुष्य पण पाहिजे आणि त्याला सोन्याच्या चमच्याने दूध पितांना पाहायचे म्हणजे धनसंपत्ती हवी आणि दृष्टीही आली पाहिजे. एका वरात किती गोष्टी मागितल्या!

तसंच, नेहरूवादी समाजवादाच्या काळात आपण फक्त एकच गोष्ट, साधी गोष्ट मागितली. शेतीमालाचा भाव. भीक म्हणून नव्हे, हक्क म्हणून. कारण आम्हाला माहित होतं की शेतीमालाचा भाव शेतकऱ्यांना मिळाला म्हणजे समाजवादी नेहरूव्यवस्थेच्या गळ्याला हूक लागलाच, त्यानंतर ती व्यवस्था टिकूच शकत नव्हती. हे ती व्यवस्था चालवणारेही जाणून होते म्हणूनच त्यांनी हर प्रयत्नाने शेतकरी आंदोलन मोडून काढण्याचा प्रयत्न केला. पण, शेतकऱ्यांना आणि उद्योजकांना लुटून उभी राहिलेली ही समाजवादी नेहरूव्यवस्था टिकूच शकत नाही याची आम्हाला खात्री होती. आणि आमचं म्हणणं आता खरं ठरलं आहे.

आज आपल्यापुढे प्रश्न काय आहे? सध्या चालू आहे ती निवडणूक आहे का? मी तरी आज जे चाललं आहे त्याला निवडणूक म्हणायला तयार नाही. स्वातंत्र्यानंतर निवडणुकांच्या नावाने जे काही झालं त्या निवडणुका नव्हत्या. मग ते काय होतं?

विदर्भातले एक कवी विठ्ठल वाघ यांची एक फार प्रसिद्ध कविता आहे. जनता – गरीबगुरीब शेतकरी माणसं त्यांच्या कवितेत म्हणतात,

*आमी मेंढरं मेंढरं*
*यावं त्यानं हाकलावं*
*पाचा वर्साच्या बोलीनं*
*होतो आमचा लिलाव –*

आतापर्यंत ज्या आठ निवडणुका झाल्या त्या निवडणुका नव्हत्या, ते लिलाव होते; शेतकऱ्यांच्या भाग्याचे लिलाव. निवडून यायचं म्हणजे काय करायचं? मुंबईला जायचं, दिल्लीला जायचं आणि शेतकऱ्यांना लुटायचा गुत्ता घ्यायचा. शेतकऱ्यांना, उद्योजकांना, कष्टकऱ्यांना लुटायचं कोणी, त्यांना लुटायच्या व्यवस्थेवर बसायचं कुणी याचा गुत्ता मिळविणारे लिलाव म्हणजे या निवडणुका झाल्या.

आता या निवडणुकीमध्ये पहिल्यांदा अशी शक्यता तयार झाली की लिलाव टाळून लोकांना खऱ्या अर्थानं स्वतंत्र होता येईल. गांधीजींच्या अंतःकरणामध्ये ज्या स्वतंत्र देशाची कल्पना होती, तो स्वतंत्र भारत तयार होईल अशी शक्यता पहिल्यांदा तयार झाली आहे.

आपण ज्याला बळीराज्य म्हणतो ते तयार व्हायची शक्यता पहिल्यांदा तयार झाली आहे. या बळीराज्यामध्ये प्रत्येक उद्योजकाला आपल्या इच्छेप्रमाणे व्यवसाय करता येतो. त्याला 'सरकार' नावाची कोणी शक्ती सांगत नाही की हे पिकव, ते पिकवू नको, धाना(भाता)चे तांदूळ करू नको, तांदूळ दुसऱ्या जिल्ह्यात नेऊ नको, परदेशात नेऊ नको. असं राज्य म्हणजे बळीराज्य. आणि असं बळीराज्य तयार होण्याची शक्यता स्वातंत्र्यानंतर प्रथमच तयार झाली आहे.

तरीही या निवडणुकीमध्ये, सगळे लोक येऊन मतदारांना काय सांगताहेत? सगळे म्हणतात आमच्या पक्षाला मतं द्या. काहीही बोला, पण मतं आम्हाला द्या.

काँग्रेसवाले म्हणतात, "गेली सत्तेचाळीस वर्ष आम्ही देशाला बुडवलं हे खरं असलं तरी आम्हाला मतं द्या. पुढच्या वेळी आम्ही देश सुधारू."

भाजपावाले येतात अन् सांगतात, 'आम्हाला मंदिर बांधायचं आहे' म्हणून आम्हाला मतं द्या, दुसरे लोक येतात आणि 'आम्ही नोकरीमध्ये कोणत्या जातीला किती जागांचे आरक्षण द्यायचे ते ठरवतो' म्हणून आम्हाला मतं

द्या म्हणतात. आंध्रप्रदेशात एन्. टी. रामारावांनी म्हटलं आम्ही दोन रुपये किलो तांदूळ देऊ आणि ते निवडून आले, मुख्यमंत्री झाले. मग महाराष्ट्रातले 'विद्वान' पुढारीसुद्धा बोलायला लागले –

दोन रुपये किलो तांदूळ देतो म्हटल्यावर मुख्यमंत्री बनता येते ही नामी युक्ती सापडली. आम्ही काय कमी आहोत का? आम्ही दीड रुपये किलोनी ज्वारी देतो.

आपल्यातले बरेचजण ज्वारी पिकवतात. ज्वारी जर का दीड रुपया किलोने बाजारात विकली तर ज्वारी पिकवणाऱ्या शेतकऱ्यांनी आणि शेतमजुरांनी काय खायचं, माती? मतांच्या जोरावर खुर्ची मिळते ना, मग काहीही बोला!

आणि त्याच्या पलिकडे जाऊन लोक म्हणतात, 'तुम्हाला ज्वारी विकत घ्यायची, ती दळायची, त्याच्या भाकऱ्या करायच्या असा तरी त्रास कशाला? आमच्या पक्षाचा कार्यक्रम असा की आम्ही तयारच भाकरी-पिठलं तुम्हाला रुपयात देतो!'

पाहा. देश गहाण पडतो आहे, गरीबी संपत नाही, कर्ज संपत नाही, जगामध्ये देश आपला शेवटच्या क्रमांकाला चाललाय आणि यांचा कार्यक्रम काय तर भाकरी-पिठल्याची दुकानं काढायचा! खा आणि मजा करा, स्वस्त भाकरी पिठलं!

या निवडणुकीत सगळे पक्ष समोर येऊन जातात – काँग्रेसचा झेंडा घेऊन येतात, जनता दलाचा झेंडा घेऊन येतात, भाजपाचा घेऊन येतात, शिवसेनेचा घेऊन येतात. पण, या सर्व पक्षांचे खरंच एकमेकांत भांडण आहे काय? याचं काही एकमेकांत वैर आहे का? वेगवेगळ्या ठिकाणाहून वर्तमानपत्रांत आलेल्या बातम्या पहा. वर्धा जिल्ह्यामध्ये हिंगणघाट मतदार संघात मी निवडणुकीचा फॉर्म टाकला आहे. निवडुन द्यायचं किंवा नाही ते मी तेथील जनतेवर सोपवलं आहे.

मी निवडणुकीला उभा आहे म्हटल्यावर भाजपाचं रक्त खवळलं. आणि त्यांच्या नेत्यांनी सांगितलं की काही झालं तरी शरद जोशींना पाडलं पाहिजे. एक वेळ आम्ही शरद पवारांशी दोस्ती करू पण शरद जोशी आम्हाला परवडणार नाहीत. म्हणजे हिंगणघाटमध्ये भाजपा काँग्रेसबरोबर दोस्ती करायला तयार. आणि मराठवाड्यात गोपीनाथ मुंडे काय म्हणतात? ते उघड उघड म्हणतात की, शरद पवार गुंडांना सामील आहेत, त्यांनी हजारो कोटी रुपये कमावले आहेत, हा भामटा आहे.' पण इकडे हिंगणघाटमध्ये मात्र भाजपावाले म्हणतात शरद पवार परवडला पण शरद जोशी नको कारण तो कापसाला भाव मागतो. पुणे जिल्ह्यात जनता दलाचे लोक शिवसेनेशी दोस्ती करताहेत. म्हणजे काँग्रेस, भाजपा, शिवसेना, जनतादल हे सगळे एक आहेत. कारण, हे सगळे लोक म्हणजे आतापर्यंत निवडणुकीत 'शेतकऱ्यांना लुटण्याचा गुत्ता आपल्यालाच मिळावा' म्हणून सतत धडपडणारे पक्ष आहेत.

आता त्यांच्या लक्षात आलं आहे की शेतकरी जागा झाला आहे, शेतकऱ्याची चोरी होते ती पकडली गेली आहे. आता काही आपली धडगत नाही. आज जरी दिसत नसलं तरी पुढच्या निवडणुकीत स्वतंत्र भारत पक्ष एका बाजूला आणि दुसऱ्याला बाजूला हिंदुस्थानातले बाकीचे सगळे पक्ष असं चित्र उभं राहाणार आहे. एका बाजूला हे छोटं देवकीचं बाळ आणि दुसऱ्या बाजूला सगळे कंसमामा एकत्र झालेले दिसणार आहेत.

आमचं म्हणणं काय आहे? आमचं म्हणणं असं आहे की स्वातंत्र्यानंतर सत्तेचाळीस वर्षे देश खाली खाली जात राहिला याचं कारण इंग्रजांनी आपल्या – शेतकऱ्यांच्या आणि उद्योजकांच्या हातात घातलेल्या बेड्या हातातून निघायच्या आधी समाजवादाच्या बेड्या आमच्या हाती आल्या. आणि त्यामुळे हिंदुस्थानात कोणीच सुखी झालं नाही. शेतकरी दुःखी आहे, व्यापारीसुद्धा दुःखी आहे, कारखानदार दुःखी आहे. आपल्यातले तरुण व्यापार करायला शहरात जातात, ते काय सांगतात? ते म्हणतात व्यापार करणंसुद्धा तितकं सोपं नाही. तुम्ही पुढाऱ्यांशी संबंध ठेवले, पुढाऱ्याच्या छत्रीखाली असलात तर तुम्हाला लायसन्स्-परमिट मिळतं, एरवी, व्यापारी प्रामाणिकपणे काम करायला गेला तर त्याचं आयुष्यसुद्धा फार कठीण आहे. डॉक्टर तेच म्हणतात, वकील तेच म्हणतात, उद्योजक तेच म्हणतात, लेखक तेच म्हणतात, कवी तेच म्हणतात, खेळाडू तेच म्हणतात.

स्वातंत्र्यानंतर देश सुधारला असं कोणीच म्हणत नाही, तीन लोक सोडून. स्वातंत्र्यानंतर देश सुधारला असं म्हणणारे हे तीन लोक कोण?

पहिला म्हणजे पुढारी. स्वातंत्र्य मिळालं तेव्हा, १९४७ साली पुढारी मंडळी खादीचे धुवट कपडे घालत होती आणि त्यांच्या चपलेला निदान तीन चार ठिगळं लावलेली असायची; आणि जर का जिल्ह्याच्या गावी जायचं तर गावातल्या लोकांना वर्गणी जमवून त्यांच्या प्रवासाची सोय करावी लागायची. असा पुढारी होता ४७ साली; त्यागी, कष्ट करणारा, सेवा देणारा. आणि आज ९५ सालचं चित्र काय? पुढाऱ्याचं वजन निदान अर्ध्या टनाचं, पांढरे शुभ्र कपडे, कित्येक गाड्यांचा ताफा, त्यांच्या मागे लाचारांची फौज, जिल्ह्याच्या ठिकाणी किती बंगले, किती जमिनी, राज्याच्या राजधानीत किती आणि दिल्लीत किती! पैशाचा हिशेब आता हजारात नाही, लाखात नाही, कोट्यावधी रुपयांत असतो. असा पुढारी खूष आहे. तो म्हणतो समाजवाद चालू द्या, लायसन्स-परमिट राज चालू द्या, आमचं उखळ पांढरं होऊ द्या.

दुसरा खूष नोकरदार. ४७ साली म्हण होती 'उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी.' आता उत्तमच नव्हे तर नोकरी म्हणजे स्वर्गच आणि शेती म्हणजे नरकच. ४७ वर्षांपूर्वी मुलीचा बाप म्हणायचा, पंधरावीस एकरवाल्याच्या घरी मुलगी दिली तर सुखाने नांदेल; नोकरमान्या नको. आज काय स्थिती आहे? आता मुलीचा बाप पंचवीस एकराच्या मालकालासुद्धा मुलगी द्यायला तयार होत नाही; म्हणतो, 'दुष्काळ पडला तर खडी फोडायला जायला लागेल पोरीला, त्यापेक्षा एस्.टी. कंडक्टर जावई परवडला.' ही सगळी नेहरूनीतीची कृपा.

सत्तेचाळीस वर्षांच्या नेहरू अंमलाने आणखी कोण खूष झाले? खूष झाले गुंड. राज्य चालू कुणाचं झालं? 'दाऊद इब्राहिम', 'अरुण गवळी' आणि प्रत्येक जिल्ह्यातले गुंड नेहरूराज्यावर खूष आहेत.

पुढारी, नोकरदार आणि गुंड हे देशबुडवे. शेतकरी संघटनेच्या नागपूर अधिवेशनाची घोषणा – 'नेता, तस्कर, गुंडा, अफसर, मंडल मंदिर मस्जिदवादी, देश के दुष्मन.' देश बुडायला आला आहे पण त्यांना

त्याची पर्वा नाही.

मग, या निवडणुकीमध्ये स्वतंत्र भारत पक्ष नावाचा मंच शेतकरी संघटनेने का तयार केला?

१९८० साली मी शेतकऱ्यांना सांगितलं की स्वातंत्र्य मिळालं तरी तुमची गरीबी हटली नाही कारण हे सरकार. 'शेतकऱ्याचं मरण, हे सरकारचं धोरण' हे मी ८० साली सांगितलं. आज केवळ शेतकऱ्यांची संघटना बांधून चालणार नाही. आज, मी हिंदुस्थानातल्या सगळ्या लोकांना – पुढारी, नोकरदार आणि गुंड सोडून सगळ्यांना सांगतो आहे की सरकारचं धोरण फक्त शेतकऱ्याचे मरण नाही; सरकारचं धोरण म्हणजे देशाचं मरण आहे. देश वाचविण्यासाठी सगळ्यांनीच उठलं पाहिजे.

देश कसा काय वाचवायचा? हे कठीण काम आहे का? मुळीच नाही. शेतकरी संघटनेच्या कार्यक्रमाचा विस्तार करून स्वतंत्र भारत पक्षाने एक तीस कलमी कार्यक्रम आखला आहे. देशाचा रोग काय आहे? नेहरूंचा समाजवाद. स्वातंत्र्याच्या आधी आपण समाजवादाविषयी कधी बोललो नव्हतो. गांधीवाद हा स्वातंत्र्य चळवळीचा पाया होता आणि तोच उद्देश होता. थोडक्यात सांगायचं तर गांधीवाद म्हणजे 'गाव मोठं, शेती मोठी, सरकार छोटं.' गांधीजी गेले अणि दिवाणजी म्हणून नेहरूंच्या हाती किल्ल्या आल्या आणि त्यांनी मालकांची पोरं देशोधडीला लावली आणि ते म्हणू लागले 'शहर मोठं, कारखाना मोठा आणि सरकार त्याहून मोठं.' देशाचा रोग हा आहे. मग त्यावर औषध काय?

या रोगावर औषधयोजना करायला हवी, झपाट्यानं करायला हवी. हा रोग झाला आहे हे मनमोहनसिंगही मानतात. पी. व्ही. नरसिंह रावसुद्धा म्हणतात की नेहरूंनी देशाचं वाटोळं केलं. या शब्दात म्हणत नसले तरी ते म्हणतात त्याचा अर्थ हाच होतो. पण औषधोपचार करायचा म्हटला की मात्र काँग्रेसचे हातपाय लटपटतात. काहीजण म्हणतात औषधोपचार हळूहळू केला पाहिजे.

औषधोपचार काय आहे? गेल्या सत्तेचाळीस वर्षामध्ये देशामधील उत्पादक घटकांवर जी काही बंधनं घातली – लेव्ही, जीवनावश्यक वस्तूंचा कायदा, मालमत्तेसंबंधी

## स्वतंत्र भारत पक्ष – जाहिरनामा महाराष्ट्र विधानसभा निवडणूक, फेब्रुवारी १९९५

नेहरूवादी समाजवादाचे भयानक दुष्परिणाम भोगत असलेल्या, कायदा आणि सुव्यवस्था संपूर्ण कोलमडून पडल्यामुळे हबकलेल्या, आणि राजकीय भ्रष्टाचार, अकार्यक्षमता, गुन्हेगारीकरण, नेता-गुंडा युती यांची कमाल मर्यादा गाठलेल्या **महाराष्ट्र राज्याचे** उद्यमी, उन्मेषी, कार्यक्षम अशा सर्वांसाठी एका नवीन आशास्थानात रूपांतर करण्यासाठी **स्वतंत्र भारत पक्ष,** महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक क्षेत्रावरील नेहरूवादी समाजवादाचे विषारी परिणाम रोखण्याचे व नाहीसे करण्याचे खालील उपाय योजण्यास वचनबद्ध आहे.

(अ) **कायदा व सुव्यवस्था**

१. गुन्हेगारी टोळ्या, दशहतवाद आणि आक्रमक धर्मवेडेपणाचा निष्ठूरपणे निःपात.
२. सर्व सामाजिक कायद्यांच्या अंमलबजावणीस पाच वर्षांची स्थगिती.
३. कालबाह्य कायदे आणि तरतुदी रद्द करण्यासाठी सर्व कायद्यांचे पुनरावलोकन, सध्याच्या कायद्यांचा बुजबुजाट कमी करून फक्त नागरी, गुन्हेगारी, आर्थिक व सामाजिक अशा चारच संहिता निर्माण करण्यासाठी विविध दुरूस्त्या, अधिसूचना, अध्यादेश आणि आदेशांचे एकत्रीकरण.
४. कायद्याच्या ज्ञानाचे गृहीतत्व संबंधित संहितेच्या अत्याधुनिक आवृत्तीपुरतेच मर्यादित राहील अशा रीतीने सर्व संहितांच्या नवीनीकरणाची सुनियोजित कारवाई.
५. सर्व मान्यताप्राप्त न्यायिक निवाड्यांचे संगणकीकरण.
६. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अखत्यारीत, जनतेला उत्तरदायी असलेल्या संरक्षक दलांची स्थापना; अशा संस्थांच्या अंतर्गत वादातच राज्य पोलिसांचा हस्तक्षेप.
७. न्यायिक बाबींमध्ये ग्रामपंचायतींना अधिकार, आणि अशा अधिकारांची सुस्पष्ट व्याख्या.
८. भ्रष्टाचार, बालकांवर अत्याचार, बलात्कार व सार्वजनिक विश्वासघाताच्या गुन्ह्यांसाठी मृत्युदंडाची व जबर शिक्षेची तरतूद.

(ब) **शासनयंत्रणेत काटछाट**

१. प्रशासकीय खर्चात भरीव कपात करण्यासाठी
 अ. मंत्रालये, विभाग व कार्यभारांची समाप्ती, यासाठी
 ब. आस्थापना, कर्मचाऱ्यांच्या सोयी-सवलती आणि कार्यालयीन उधळपट्टी कपात.
 क. प्रशासकीय व सनदी सेवांचे उच्चाटन
२. राज्याच्या एकाधिकाराखाली असलेली सर्व क्षेत्रे व उद्योग, विशेषतः उत्पादन (विशिष्ट प्रकारची संरक्षण उत्पादने वगळता), ऊर्जा निर्मिती, खनिकर्म, सार्वजनिक वितरण प्रणालीसह सर्व वितरण, देशांतर्गत तसेच विदेशी व्यापार, पर्यटन, हॉटेलउद्योग इ.ची स्पर्धेसाठी मुक्तता.
३. 'नाही-रे' च्या हुकूमशाहीऐवजी 'आहे-रें' ची, 'आहे-रें' करिता, 'आहे-रें' द्वारा प्रस्थापित अशा लोकशाहीची प्रतिष्ठापना करण्यासाठी, उद्योगांचे व्यवस्थापन आणि मालकी कर्मचाऱ्यांकडे, उपभोक्त्यांकडे, आणि कच्चा माल व सेवांच्या पुरवठादारांकडे हस्तांतरित करण्याचे दृष्टीने सुनियोजित व परिपूर्ण योजना.
४. निवडक शासकीय कल्याणकारी योजनांचे क्रमशः विसर्जन, आणि त्यांचे सुयोग्य सेवाभावी संस्थांकडे हस्तांतरण.
५. स्वयंसेवी संस्थांच्या विकासकार्यातील वाढत्या सहभागाला अनुसरून राज्याच्या तथाकथित विकास खर्चात योजनाबद्ध कपात.
६. प्रत्यक्षपणे, अथवा सध्या अस्तित्वात असलेल्या सेवांचे खाजगीकरण करून व सध्याचा नोकर वर्ग विकास कार्याकडे वळवून संदेशवहन, दळण वळण सेवा, ऊर्जा, जल, तंत्रज्ञान व संसाधन पद्धतींचा विकास.
७. इ. स. २००० पूर्वी कृष्णेच्या पाण्याचा विनियोग.

(क) **आर्थिक सुधारणा :**

१. राज्याच्या नवीन भूमिकेशी सुसंगत अशा प्रकारे कर्जपातळी कमी करून, राष्ट्रीय कर्जावरील व्याजाच्या बोजात कपात.
२. चालू खर्चासह सर्व सरकारी खर्चाची सर्वंकष तपासणी, सर्व सरकारी कामकाजात आत्यंतिक साधेपणा व बचत. अन्यायी सरकारचे खुऱ्याखुऱ्या लोकसेवक सरकारमध्ये परिवर्तन.
३. शेती व दारिद्र्य निर्मूलनासाठी घेतलेल्या सर्व कर्जांची समाप्ती.
४. नफा, वेतन, भाडे, व्याज यांचे प्रमाण मर्यादित ठेवण्यासाठी बाजारव्यवस्थेवर नजर. उपभोक्त्यांच्या हक्कांना प्राधान्य मिळेल अशी व्यवस्था.
५. करनिर्धारण पद्धतीचे संलग्नीकरण स्थापित क्षमता, खेळते भांडवल, व्यावसायिक वा राहण्याच्या जागेचे क्षेत्रफळ, व ऊर्जा वापर यांच्याशी करून, कर-पद्धती पारदर्शक आणि अ-पक्षपाती करण्याचे दृष्टीने आमूलाग्र सुधारणा. ऑक्ट्राय व विक्रीकरांची समाप्ती.
६. कोणत्याही कर तपासणी अधिकाऱ्यास कोणत्याही नागरिकाचे व्यावसायिक अथवा वैयक्तिक हिशेब मागण्याचा अथवा तपासण्याचा अधिकार असू नये, या तत्त्वाला मान्यता.
७. न्याय, बुद्धी, धर्म अथवा अभिव्यक्तीशी संबंधित कोणत्याही संस्थेचे शासनामार्फत नियंत्रण, दिग्दर्शन अथवा विघटनास बंदी. आपले स्वतःचे भांडवल स्रोत उभारण्यास या संस्थांना अधिकार.
८. उत्पादन परवाने, मालकी, भाडेपट्टी, भाड्याने घेण्या वा देण्यावरील सर्व प्रतिबंध, व्यापार, निर्यात, आयात यांवरील सर्व निर्बंध ज्या दिवशी संपुष्टात येतील अशा 'शून्य नियंत्रण दिवसा' ची लवकरात लवकर घोषणा. यापैकी जे निर्बंध अत्यावश्यक वाटतील ते योग्य तपासणीनंतर व मान्यतेनंतर पुन्हा अमलात आणता येतील.

(ड) **सुधारणेचे उपाय**

१. सफाई, कामगार, वेश्या, गुन्हेगार जमाती व भटक्या जमातींचे पुनर्वसन.
२. सर्व वैयक्तिक संपत्तीत वैवाहिक जोडीदाराचा संयुक्त मालकी हक्क.
३. गत पाच वर्षापासून राजकीय, प्रशासकीय अथवा सहकारी क्षेत्रात अधिकारपद भोगलेल्या सर्व व्यक्तींच्या संपत्तीची जाहिर चौकशी.

हक्कांवरील बंधने, व्यवसाय-व्यापार उदीमावरील बंधने इत्यादी – झटकन काढून टाकली पाहिजेत. काँग्रेस सरकारचं म्हणणं ती हळूहळू काढावी. म्हणजे कसं होणार? कुत्र्याचं शेपूट तोडायचं असेल ते झटकन बुडख्यापासून तोडलं तर कुत्रं एकदाच ओरडेल, थोडा वेळ विव्हळेल आणि मग शांत होईल. त्याऐवजी रोज थोडं थोडं कापलं तर कुत्रं रोज केकाटणार आणि एखाद्या दिवशी संधी साधून चावणार. नेहरूनीतीनं देशाचं वाटोळं झालं हे सर्वमान्य झाल्यानंतर ती टाकून द्यायची म्हणजे कुत्र्याच्या शेपटाप्रमाणे एका झटक्यातच तोडायला हवी.

देशामधील नेहरूव्यवस्था टाकून, खुली व्यवस्था आणून देशाचं भलं व्हायला तीन वर्षे पुरी आहेत. खुली व्यवस्था आणायला मनमोहन सिंगांनी सुरुवात केली; जगाशी व्यापार करू, आयात करू, निर्यात करू, गुंतवणूक करू असं ठरवलं. पण त्यानंतर दोनतीन गोष्ट घडल्या त्यामुळे त्यांचा संकल्प पुढे जाऊ शकला नाही. तुम्ही जगाशी व्यापार करायला तयार झालात तरी जग काही तुमच्या व्यापार करायला धजत नाही.

अयोध्येची मशीद पाडली आणि सगळ्या हिंदुस्थानात दंगे झाले. वाहतूक ठप्प झाली. सगळा व्यवहार बंद पडला. जळगावची केळी, नाशिकची द्राक्ष जागच्या जागी खलास झाली. जगभरचे लोक म्हणाले यांना पोरांना खायला भाकरी देता येत नाही आणि तेराव्या शतकात तिथं मशीद होती का मंदिर यावर भांडण करून हे सगळे व्यवहार ठप्प करतात. यांच्याशी व्यापार करू नये. उद्या हे कशावर भांडण काढतील कोण जाणे आणि आपलं कंत्राट पुरं करतील की नाही याचीही शंका.

त्यानंतर मुंबईत बॉंबस्फोट झाले. त्यावेळी व्यापारी करार करायला आलेली शिष्ठमंडळे करार न करता परत गेली. ज्यांना कायदा आणि सुव्यवस्था पाळता येत नाही, जिथं गुंडांचं अधिराज्य आहे त्यांच्याशी व्यापार करून धोका कोण पत्करणार?

चारपाच महिन्यांपूर्वी हिंदुस्थानात प्लेग झाला. साऱ्या जगात प्लेग नावाची गोष्ट शिल्लक नाही. फक्त हिंदुस्थानातच सापडला. प्लेग कुठून आला? नेहरूंनी शहरं वाढवली, कारखाने वाढवले, शेती उजाड केली, मग आमची पोरं शहरात जगायला गेली, झोपडपट्ट्यांमध्ये, गलीच्छ वस्त्यांमध्ये राहायला लागली. सगळीकडे गटारं तुंबलेली, चिखल साठलेला, उंदीरघुशींचा सुळसुळाट. प्लेग होईल नाही तर काय? प्लेग झाला तो नेहरूंच्या धोरणामुळे झाला. या प्लेगला नाव द्यायचं तर 'नेहरू प्लेग'च म्हणायला पाहिजे. या प्लेगने देशाची बदनामी किती झाली? आपली माणसं परदेशात गेली तर त्यांच्यावर औषध मारल्याशिवाय त्यांना आत घेत नाहीत. इथून गेलेलं विमानसुद्धा परदेशात धुवून घेतात. मग व्यापार कोण करणार आपल्याशी? ते विचार करतात, यांच्या मालातून काय रोगजंतू येतील सांगता येईल. त्यापेक्षा दुसऱ्या देशातून आणलेलं बरं.

आणि आणखी एक महत्त्वाची धोक्याची गोष्ट. आज मनमोहन सिंग आणि पी. व्ही. नरसिंहराव सगळ्या जगाला सांगताहेत की आमच्यावरचं परकीय चलनाचं संकट टळलं आहे, परकीय चलनाचा आता तुटवडा नाही. आमच्याकडे भरपूर साठा आहे. हे खरं नाही. मनमोहन सिंग खोटं बोलताहेत. हिंदुस्थानात आज डॉलर आहे याचं कारण असं की हिंदुस्थानामध्ये सध्या व्याजाचा दर जास्त आहे. आणि त्यामुळे परदेशातील बँकांनी इथं पैसे ठेवले आहेत. दुसऱ्या एखाद्या देशामध्ये जास्त चांगली गुंतवणूक होते आहे असं दिसलं की या बँका अत्यंत तातडीने आपले पैसे काढून घ्यायला लागतील. हे अशक्य नाही, मेक्सिकोत हे नुकतेच घडलं आहे. हिंदुस्थानात हे झालं तर रुपयाची किंमत पाच पैसेसुद्धा राहणार नाही.

देश इतक्या गंभीर अवस्थेत असतांनासुद्धा प्रत्येकाच्या मनात एकच अभिलाषा – मला खुर्ची कशी मिळणार? देशाच्या या गंभीर अवस्थेवर उपाययोजना स्वतंत्र भारत पक्षाने ठरवली आहे. स्वतंत्र भारत पक्षाचं राज्य आलं तर पहिल्या तीन महिन्यांची औषधयोजना अशी असेल –

१) १२ तारखेला मतमोजणी झाली की १३ तारखेला सरकारचा शपथविधी होईल आणि १५ तारखेला नेहरूव्यवस्थेने शेतकऱ्यांवर आणि शेतमजुरांवर लादलेलं कर्ज एका निर्णयाने रद्द केले जाईल.

२) सर्व नागरिकांना सुरक्षिततेत जगता आलं पाहिजे. आज गुंडांचा बंदोबस्त होत नाही कारण गुंडाना पुढाऱ्यांचं संरक्षण आहे. पुढाऱ्यांचं संरक्षण संपलं तर सर्व गुंड ३० दिवसांच्या आत गजाआड होतील. मग देशातील कायदा व सुव्यवस्था सुरळीत होऊन पुन्हा एकदा 'काठीच्या टोकाला सोनं बांधून निर्धास्तपणे काशीला जावं' अशी स्थिती येईल.

३) बळीराज्याची स्थापना करण्यात येईल.

बळीराज्यामागचा विचार लक्षात घ्या. सरकार काहीही भलं करीत नाही. सरकारनं काम केलं आणि चांगलं झालं असं एकसुद्धा उदाहरण नाही. सरकार कोणतीही समस्या सोडवत नाही, सरकार हीच समस्या आहे. हिंदुस्थानातला माणूस बुद्धिमान आहे, कर्तबगार आहे, कष्टाळू आहे. अमेरिकेसारख्या देशात गेलेल्या हिंदुस्थानी लोकांच्या या गुणांबद्दल तेथील सरकारला कौतुक आहे. पण हीच माणसं हिंदुस्थानात राहिली तर त्यांची माती होते. कारण? कारण, लायसन्स-परमिट-कोटा इन्स्पेक्टर राज. ही सगळी बंधनं काढून सर्व उद्योजकांना, शेतकऱ्यांना, कारखानदारांना, व्यावसायिकांना मोकळं करण्याचं काम स्वतंत्र भारत करणार आहे. १९८० साली मी म्हटलं गरीबी हटवण्यासाठी २० कलमी कार्यक्रम नको की ३० कलमी नको, शेतीमालाच्या भावाचा एक कलमी कार्यक्रम घ्या म्हणजे गरीबी हटेल. महात्मा गांधींनी गरीबी हटविण्यासाठी काय कार्यक्रम सांगितला होता? IRDP सांगितला नव्हता, नियोजन सांगितलं नव्हतं, एकात्मिक ग्रामीण विकासाचा कार्यक्रम करा असं सांगितलं नव्हतं, भाकरी पिठल्याची दुकानं घाला म्हणूनही सांगितलं नव्हतं. गरीबी हटवायची असली तर गरीबाच्या छातीवर बसला आहात तिथून उठायची तेवढी मेहेरबानी करा म्हणजे तो आपला आपण चालायला लागेल.

स्वतंत्र भारत पक्षाचा कार्यक्रम हा देशातल्या माणसाला, ज्याचे बुद्धिमत्ता, कर्तबगारी आणि कष्टाळूपणा हे गुण परदेशांत अगदी पुढारलेल्या राष्ट्रांतसुद्धा कौतुकाचे आणि आदराचे विषय आहेत, त्या माणसाच्या छातीवरून 'सरकार'ला उतरविणे आणि माणसाला त्याचे स्वातंत्र्य देणे.

●

**सरकार समस्या क्या सुलझाए,**
**सरकार यही समस्या है।**

# ग्रामपंचायतींच्या निवडणुका बिनविरोध करू या

महाराष्ट्रातील ग्रामपंचायतींच्या निवडणुका जाहिर झाल्या आहेत. शेतकरी संघटनेने नांदेड अधिवेशनातच त्याबाबत भूमिका निश्चित केली आहे. निवडणुकीच्या वातावरणाने गावामध्ये गट तयार होतात त्याचा फायदा राजकीय पक्षांचे पुढारी घेतात. म्हणून ग्रामपंचायतीची निवड(णूक) गावातील सर्व नागरिकांनी एकत्र चर्चा करून बिनविरोध करावी असे नांदेड अधिवेशनात ठरले.

आमच्या विटनेर गावाच्या शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी मागील निवडणुकीच्या वेळी तसा प्रयत्न केला असतां गावातील पारंपरिक पुढाऱ्यांनी त्यात हटवादीपणा करून मोडता घातला. त्यांना धडा शिकविण्यासाठी, कार्यकर्त्यांनी त्या पुढाऱ्यांचे नाक ठेचण्यासाठी शेतकरी महिला आघाडीचे 'संपूर्ण महिला पॅनेल' उभे केले आणि त्या पुढाऱ्यांना गावाच्या कारभारातून काढून लावले. गेली पाच वर्षे आम्ही महिला गावाचा कारभार चांगल्या प्रकारे चालवीत आहोत. त्याही पलिकडे केवळ सदस्य महिलाच नव्हे तर गावातील सर्वच महिलांमध्ये आत्मविश्वास तयार झाला आहे.

आता पुन्हा निवडणुका आल्या आहेत म्हणून नांदेड ठरावाची आठवण करून देण्यासाठी हे पत्र लिहित आहे. शेतकरी संघटनेच्या सर्व भावांना आणि शेतकरी महिला आघाडीच्या बहिणींनाही विनंती करते की त्यांनी आपापल्या गावामध्ये सर्व गावकऱ्यांच्या सल्लामसलतीने आणि संमतीने आपल्या ग्रामपंचायतीच्या सदस्यांची निवड बिनविरोध घडवून आणावी. सर्व सदस्यांमधील महिला सदस्यांची संख्या निम्म्यापेक्षा कमी असणार नाही आणि त्यांचा निर्णयप्रक्रियेतील सहभाग परिणामकारक असेल अशी ग्रामपंचायत तुमच्या गावात तयार झाली तर गावातील जनजीवन सुखाचे, समाधानाचे आणि खऱ्या अर्थाने गाव चालविण्याची धुरा ज्या महिलावर्गावर असते त्यांच्या सोयीचे होईल. बळीराज्याच्या स्थापनेसाठी हे आवश्यक कार्य आहे आणि ते तुम्ही कराल अशी खात्री आहे म्हणून हा मोका साधून लगेच लिहिले आहे.

**सौ. इंदिरा भानुदास पाटील**
मु. पो. विटनेर, ता. चोपडा,
जि. जळगाव.

## साक्षात्कार!

### सहकारक्षेत्र आता उपयोगाचे नाही

**– डॉ. आप्पासाहेब पवार**

"जगाच्या बाजारात टिकायचे असेल, तर त्याला सहकार क्षेत्र फारसे उपयोगाचे नाही. नवीन उद्योजकांनी सहकारक्षेत्राच्या मागे न लागता कंपनी कायद्याखाली नोंदणी करून स्वतःचा धंदा सुरू करावा.....

"भारतासारखा संपन्न देश जगाच्या पाठीवर कुठेही नाही. आपला शेतकरी शेती चांगली करतो; पण तो माल विकू शकत नाही म्हणून त्याचा पराभव होतो....

"खेड्यांचा विकास नुसत्या कारखानदारीने होणार नाही. शेतीचाही विकास उद्योगाबरोबरच झाला पाहिजे. खेड्यातील लोकांच्या हातात पैसा आला तरच ते औद्योगिक मालाचे ग्राहक होतील....."

*(ख्यातनाम कृषितज्ज्ञ डॉ. अप्पासाहेब पवार यांनी वैकुंठ मेहता इन्स्टिट्यूटमध्ये भरलेल्या व्यापारी शेती कार्यशाळेत केलेल्या अध्यक्षीय भाषणातून.... आधार – सकाळ १८/२/९५)*

**सरकार गुंडपुंडांचे नको, गुंडपुंडांचे निर्दालन करणारे सरकार हवे.**

# काय करील 'मंडल'?

## १६ नोकऱ्यांसाठी १० लाख अर्ज

तिरुअनंतपुरम जवळील पट्टम गावातील पोस्ट ऑफिस गेल्या महिन्यात, लोकसेवा आयोगाच्या नावे आलेल्या लाखो पत्रांनी तुडुंब भरले. खादी आणि ग्रामोद्योग मंडळामध्ये भरावयाच्या कारकुनांच्या केवळ १६ जागांसाठी लोकसेवा आयोगाने जाहिरात दिली होती आणि त्यासाठी आलेल्या अर्जांची संख्या दहा लाखाहून अधिक आहे.

केरळमध्ये हा काही नवीन प्रकार नाही. काही महिन्यांपूर्वी नगरपालिकांमधील कारकुनांच्या ३० जागांसाठी ७ लाख इच्छुकांनी अर्ज केले होते. मागच्या जुलैमध्ये केंद्रीय राखीव पोलिस दलातील ५० महिला पोलिसांच्या जागांसाठी ५००० तरुणींनी अर्ज केले होते; त्यांतील बहुसंख्य पदवी किंवा पदव्युत्तर पदवी धारण केलेल्या होत्या. निवडीसाठी दोन दिवस अहोरात्र मुलाखती चालल्या होत्या.

केरळचे सरकार मोठ्या संख्येने रोजगार निर्माण केल्याचा दावा करीत असले तरी बेरोजगारीचा प्रश्न अधिकाधिक बिकट होत चालला आहे. राज्याच्या सेवायोजन कार्यालयांच्या रजिस्टरमध्ये १९८१ साली १९ लाख सुशिक्षित बेरोजगारांची नोंद होती, १९९० मध्ये हा आकडा फुगन ३६ लाख म्हणजे जवळजवळ दुप्पट झाला होता; ऑक्टोबर ९४ पर्यंत तो ४३ लाखावर जाऊन पोहोचला आहे.

शिक्षणात अग्रेसर, सर्वात कमी जन्मदर (१.७५ टक्के दरसाल) आणि रोजगारासाठी राज्याबाहेर कुठेही (केवळ आखाती देशात आज ७ लाख लोक मल्याळी आहेत) जाण्याची तयारी असलेल्या लोकांच्या राज्याची ही स्थिती तर इतर राज्यांची काय अवस्था असणार?

*(द टाईम्स् ऑफ इंडिया, १६ फेब्रुवारी १९९५ वरून)*

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 23 February 1995

**To**

SHETKARI SANGHATAK
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
February 21, 1995

PNCW 281
Licence to post without prepayment
No. 87

# स्वातंत्र्य लढ्याचा निर्णायक भाग सुरू झाला आहे.....

**मा. शरद जोशी यांस**

**स. न. वि. वि.**

आपण मला स्वतंत्र भारत पक्षातर्फे विधानसभेचे पारोळा-मडगांव मतदार संघाचे उमेदवारीची संधी दिली, एवढेच नाही तर अतिशय प्रतिकूल परिस्थितीत प्रवास करून (अशा स्थितीत सामान्यातील सामान्य कार्यकर्त्यांनिदेखील प्रयत्न केला नसता) या मतदार संघातील आपल्या प्रेमी मंडळींना आपले विचार थोडक्यात, तरीही स्पष्ट जाणीव होईल अशा शब्दात दिलेत, होऊ घातलेल्या क्रांतीची दिशा दाखविली व मलाही आशिर्वाद देऊन आमचा सर्वांचा उत्साह द्विगुणित केला त्याबद्दल मी व माझे सहकारी शतशः आभारी आहोत. आपल्या त्या अर्ध्या तासाच्याच मतदार संघातील आगमनाने बराच प्रभाव पडलेचे लक्षात आले. कार्यकर्त्यांची हिंमत वाढली व राहिलेले दोन दिवस त्याच ताकदीवर आम्ही निर्भयपणे मत देण्याचे वातावरण तयार करू शकलो. त्या आधी दिनांक ३ व ४ ला श्री. यशवंतराव तळेले, श्री. रवि देवांग, ॲड. अशोक पाटील व आमचे दादासाहेब देशमुख यांच्या आठ ठिकाणी सभेचा कार्यक्रम आयोजित केला होताच. श्री. यशवंतरावांनी दोन दिवस दिले होते त्याचाही लाभ घेतला.

या नव्या पक्षाची स्थापना त्याचा जाहिरनामा, कार्यवाही, खुलीअर्थव्यवस्था, कर्जमुक्ती, महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य आणि गुंड व भ्रष्टाचाराचा बंदोबस्त या साऱ्या बाबींचा प्रामुख्याने विचार व त्या सोबतच शेतकरी संघटनेच्या आजपर्यंतच्या कार्याची जाणीव देऊन जनजागरण करणेचा प्रयत्न केला. प्रथमच लोकांना हे विचार ऐकायला मिळत होते, नेहमीच्या इतर पक्षांच्या प्रचाराचे पेक्षा हे काही निराळे आहे याची जाण त्यांना यायला लागलेचे लक्षात आले. काल मर्यादित, शक्ती मर्यादित, प्रथमच यात पदार्पण या सर्व बाबी लक्षात घेता आपण किती मतदारांवर परिणाम करू शकलो ते; विनासंकोच, कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता, निर्भिडपणे मतदान किती मतदारांनी केले हे निर्णयातूनच कळेल. एवढे नक्की की शेतकरी संघटनेच्या सर्व जुन्या, भक्कमपणे स्थीर झालेल्या, अनुभवी व सततचे संपर्क असलेल्या मंडळींनी त्यांचे बरोबरीने प्रचार यंत्रणा राबवून, स्वतः घरोघरी जावून, महिलाही जवळजवळ ७०% मतदारांपर्यंत जावून आपले विचार त्यांचे पर्यंत पोहोचविणेचे काम केले आहे. याचे आम्हास समाधान आहे.

आपल्या या ग्रामीण स्वातंत्र्याच्या व शेतीमालाच्या भावाच्या स्वातंत्र्यसंग्रामात जाणीवपूर्वक सहभागी झालो आहोत. या लढ्यात ज्या भावांना शहीद व्हावे लागले त्याची आम्हास जाण व स्मरण असून त्याचे प्रतीक म्हणून व स्मरण म्हणून हा संघटनेचा लाल बिल्ला आम्ही छातीवर ठेवला असून त्यांच्या त्या पवित्र स्मृतीची सतत जाण ठेवून आम्ही कार्यरत राहू. स्वतंत्र भारत पक्षाचे दृष्टीने आमच्या कुवतीनुसार प्रयत्नशील राहू अशी खात्री आपणास देऊन आपल्या आशिर्वादाची अशीच कृपा रहावी ही नम्र प्रार्थना!

आपला विश्वासू

**अशोक हरी पाटील,**

अमळदे, ता. भडगांव,

जि. जळगाव.

## मतदान संपताच स्वतंत्र भारत पक्षाच्या निवडणूक आंदोलनात शिपाईगिरी केलेल्या सर्व सैनिक उमेदवारांना श्री. शरद जोशींनी पाठविलेले कृतज्ञतापत्र.

**प्रिय मित्र** **१४ फेब्रुवारी १९९५**

**स. न. वि. वि.**

स्वतंत्र भारत पक्षाच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन आपण महाराष्ट्र राज्य विधानसभेच्या १९९५ च्या निवडणुकीत मतदारांना स्वच्छ पर्याय देण्यासाठी उमेदवार म्हणून उभे राहिलात. निवडणुकीची धामधूम संपली आहे. निकालाची वाट महिनाभर पाहावी लागणार आहे.

प्रथमतः, साधनांचा सर्व अभाव असतांनाही आपण निवडणूक कसोशीने लढविली याबद्दल आपले मनःपूर्वक अभिनंदन. निवडणुकीच्या निमित्ताने शेतकरी संघटनेच्या व स्वतंत्र भारत पक्षाच्या कामाचा प्रसार करण्यास सुरुवात झाली आहे; त्यात खंड पडू न देता आपापल्या मतदारसंघात स्वतंत्र भारत पक्षाची औपचारिक स्थापना करून सदस्य नोंदणी व प्रचाराच्या कामास तातडीने सुरुवात करावी अशी विनंती आहे.

स्वतंत्र भारत पक्षातर्फे निवडणुकीस उभ्या राहिलेल्या उमेदवारांना व इतरही काही कार्यकर्त्यांना विधानसभेचे कामकाज, स्वतंत्र भारत पक्षाची घटना, बांधणी व कार्यक्रम यासंबंधी विशेष प्रशिक्षण देण्यासाठी दोन, आवश्यक वाटल्यास तीन प्रशिक्षणवर्ग भरविण्यात येणार आहेत. त्याचे निमंत्रण आपल्याला स्वतंत्रपणे येईलच.

निवडणुकीत आपणास सुयश लाभो आणि निर्णय काहीही लागो, स्वतंत्र भारत पक्षाच्या कामासंबंधी आपला उत्साह वाढत राहो अशी इच्छा व्यक्त करतो.

कळावे.

आपला,

**शरद जोशी,**

राष्ट्रीय अध्यक्ष, स्वतंत्र भारत पक्ष

**६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.**
**प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता**
**अंगारमळा, मु. पो. आंबेठाण (४१० ५०१)**
**ता. खेड, जि. पुणे.**

**संपादक, मुद्रक, प्रकाशक**
**सुरेशचंद्र म्हात्रे**
**फोन : द्वारा - चाकण ५२३५४/५२४६८**
**एस्.टी.डी.-०२१३५**

**पाक्षिक शेतकरी संघटक**
**मालक — मोहन बिहारीलाल परदेशी**
**मुद्रण स्थळ — गणेश प्रिंटर्स,**
**६९३, बुधवार पेठ, पुणे - २.**